Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# दोष देखोनी झाकावे

19 Aug 2011, 0310 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

कोणत्याही उद्योग, व्यवसा-यात, संस्था-संघटनेत व्यवस्थापकाला किंवा नेत्याला सांभाळायचा असतो तो लोक-व्यवहार. हाता खालच्या, बरोबरच्या लोकांना एकत्र करून, त्यांच्या प्रयत्नांना, कष्टांना, कौशल्याला योग दिशा देऊन त्यांच्याकडून अपेक्षित काम यशस्वी करून घेण्याची जबाबदारी व्यवस्थापका-वर असते. त्यामुळे लोकांचे स्वभाव, वृत्ती, प्रवृत्ती, त्यांच्यातील गुण-दोष याचे अचूक ज्ञान व्यवस्थापकास असावे लागते. या ज्ञानाचा वापर करून कार्यभाग कसा साधायचा याची चतुराईही त्याच्याकडे असावी लागते.

अनेकदा व्यवस्थापक त्याच्या कर्मचाऱ्यांची जरा चूक सापडली की तिथल्या तिथे त्या कर्मचाऱ्याला दोष देतो. काही वेळा सगळ्यांसमोर त्या कर्मचाऱ्याला लागेल असे बोलतोसुद्धा. अशा वागण्याने ो कर्मचारी चांगलाच दुखावतो. त्याचा परिणाम त्याच्या कामावर होऊ शकतो. कोणाहीसाठी आत्मसन्मान सर्वात महत्त्वाचा असतो. जरी आपली चूक असली तरीही कोणालाही चारचौघात वरिष्ठांचा ओरडा खायला आवडत नाही, या गोष्टीचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे.

माझे वडील शीघ्रकोपी होते. त्यांचा हा पैलू माझ्यातही उतरला. मी व्यवसायास सुरुवात केली तेव्हा मीदेखील रागीट म्हणून ओळखला जात होतो. माझ्या कर्मचाऱ्यांकडून जराही चूक झालेली मला खपायची नाही. कोमल नावाच्या माझ्या नवीन सेक्रेटरीने कागदांना लावलेली टाचणी माझ्या बोटाला टोचली म्हणून मी भडकून तिच्या थोबाडीतच मारली होती. पण हळूहळू अशा वागण्यातील व्यर्थता मला समजली. समर्थ रामदासांच्या ओवीने माझे डोळे खऱ्या अर्थाने उघडले. समर्थ सांगतात, दोष देखोन झांकावे। अवगुण अखंड न बोलावे। दुर्जन सांपडोन सोडावे। परोपकार करूनी।।

तेव्हा माझ्याकडे विमानतळावर एअर इंडियासाठी व्ही. आय. पी. हँगर बांधायचे काम होते. एके दिवशी आमचा साइट सुपरवायझर आला नाही म्हणून मी त्याच्या जागी बसून काम करीत होतो. तेव्हा असे लक्षात आले की हा सुपरवायझर ट्रकवाल्यांबरोबर मिळून लबाडी करतोय. एकच ट्रक रेती आली तरी चार ट्रक आल्याची एंट्री केली जातेय. दुसऱ्या दिवशी तो सुपरवायझर कामावर आला. मी त्याच्यावर लक्ष ठेवायला एक माणूस बसवला होता. दिवसभरात ३० ट्रक रेती आली; पण सुपरवायझरने ४२ ट्रक आल्याची एंट्री केली होती. मी पूवीर्चा असतो तर सुपरवायझरला कामावरून हाकलून दिले असते. पण असे करून प्रश्न सुटला असता का? कदाचित त्याच्याजागी नेमलेल्या नव्या माणसाने वेगळया पद्धतीने लबाडी केली असती. म्हणून मी त्याला दुसऱ्या दिवशी माझ्या केबिनमध्ये बोलावून त्याची लबाडी उघड झाल्याची जाणीव त्याला करून दिली. त्याचा अहंकार दुखावला जाणार नाही अशा शब्दात त्याला समज दिली आणि त्यापुढे जाऊन त्याला स्टोअरचा इनचार्ज केले. त्यानंतर त्या माणसाने कधीही चोरी-लबाडी केली नाही. आजही तो माझ्याकडे काम करतो.

माणसं व्यवसायातील असोत, पक्षातील असोत किंवा आपल्या कुटुंबातील; अनेकदा दोष देखोन झाकावे हे समर्थांचे सूत्र उपयोगी ठरते.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Recommend Sign Up to see what your friends recommend.

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768